## जाहीर नोटीस (१)

सर्व संबंधितांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की , खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील रस्त्याने बाधित क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधिताकडून खाजगी वाटाघाटीने ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधितानी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

उपरोक्त मिळकतीवर वरील जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उपसंचालक नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधितांने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका तर्फे सदर जमीनीचा मोबदला खाजगी वाटाघाटीने मोबदल्याच्या स्वरूपात वरील जमीन मालकास अदा केला जाईल व जमीन महापालिका ताब्यात घेईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

### परिशिष्ट – १

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं. 9/6/1 पै.यासी सि.स.नं.931 पै. ही मिळकत 18.00 मी. रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र 127.96 चौ.मी. त्यामधिल सर्व वस्तुसह, मालकी हक्कासह, इजमेंटचे अधिकारासह यांची चतुःसिमा खालीलप्रमाणे

मिळकतधारक – श्री. दिलीप सुदाम सातव, श्रीम. शांताबाई सुदाम सातव, श्री. संजय सुदाम सातव, सौ. अनुराधा मंगेश सातव ,श्री. कुणाल मंगेश सातव, सौ. अश्विनी मंगेश सातव उर्फ सौ. अश्विनी विजय डोके, सौ. धनश्री मंगेश सातव, सौ. उज्वला दामू साळुंके.

स.नं.9/6/1 पै., सि.स.नं.931 पै. 18.00 मी. रस्त्याची चतुःसिमा – (बाधित क्षेत्र- 127.96 चौ.मी.)

उत्तेरस- लागु सि.स.नं.931 पै. ची उर्वरीत मिळकत

पूर्वेस- लागु सि.स.नं.931 पै. ची उर्वरीत मिळकत

दक्षिणेस- लागु सि.स.नं.935 ची मिळकत

पश्चिमेस – लागु सि.स.नं.872 ची मिळकत

# जाहीर नोटीस (२)

संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेले सर्व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर योजनेतील आरक्षणाने/रस्त्याने बाधीत क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या ( टि.डी. आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्बेध व निजोखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दिला आहे.

खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी,लीज लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांने प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही, कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधीताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे. असे समजून पिंपरी चिंचवड महानगरपालिका जमिन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टि डी आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल. त्यानंतर येणा-या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

परिशिष्ट १)- मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे , पोट तुकडी हवेली , येथील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील **मौजे चिखली येथील ग.नं. 710 पै. या मिळकती मधील श्री. राजकुमार मारूती मोरे, श्री. विलास धोंडीबा मोरे, श्री. विजय संभाजी मोरे व श्री. मनोज हनुमंत मोरे तर्फे कुलमुखत्यारधारक मे. श्री. गणेश असोसिएटस् तर्फे भागीदार श्री. दिपक सुरेश लांडगे व श्री. विजय सुरेश लांडगे यांचे मिळकतीमधील** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील **18.00 मी. रूंद रस्ता,** या **प्रयोजनाने बाधित क्षेत्र 201.50 चौ.मी.** जमीन त्यास चतु:सिमा खालील प्रमाणे

**चतु:सिमा मौजे चिखली गट नं.710 पै. 18.00 मी. रस्ता रूंदी (बाधित क्षेत्र 201.50 चौ.मी.)**

उत्तरेस - लागू रस्ता
पुर्वेस - लागू गट नं.710 पै, ची मिळकत
दक्षिणेस - लागू गट नं. 710 पै. ची उर्वरीत मिळकत
पश्चिमेस - लागू गट नं. 720 ची मिळकत

परिशिष्ट – २

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं. 158 अ/8इ/2 यासी सि.स.नं. 5446 पै या मिळकती मधील श्री. प्रकाश शिवनदास पमनानी (एच.यु.एफ.) तर्फे श्री. प्रकाश शिवनदास पमनानी यांचे मिळकती मधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जुन्या क्षेत्राच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. 99 (खेळाचे मैदान) या प्रयोजनाने बाधित क्षेत्र 400.00 चौ.मी. जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतुःसिमाः-

मौजे पिंपरीवाघेरे स. नं. 158 अ/8इ/2 यासी सि.स.नं.5446 पै आ.क्र.99 (खेळाचे मैदान) (बाधित क्षेत्र- 400.00 चौ.मी.)

उत्तरेस – लागू स.नं.158 पै. यासी सि.स.नं.5446 ची मिळकत
पुर्वेस - लागू स.नं.158 पै. यासी सि.स.नं.5446 ची मिळकत
दक्षिणेस- लागू स.नं.158 पै. यासी सि.स.नं.5446 ची मिळकत
पश्चिमेस - लागू सि.स.नं.5442 ची मिळकत

परिशिष्ट – ३

मिळकतीचे वर्णन – तुकडी पुणे, पोट तुकडी हवेली, येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बो-हाडेवाडी येथील ग.नं. 272/1/17 पैकी. मधील श्री. नामदेव बबनराव ढगे यांच्या मिळकतीमधील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव क्षेत्र मंजूर विकास योजनेतील 24.00 मी. रस्त्याने बाधीत 194.25 चौ.मी. जमीन त्यास चतुःसिमा खालीलप्रमाणे

चतुःसिमाः-

उत्तरेस – ग.नं.272 पै.ची मिळकत
पुर्वेस - लागु रस्ता
दक्षिणेस- ग.नं.272 पै.ची मिळकत
पश्चिमेस - ग.नं.272 पै.ची मिळकत

उपसंचालक, नगररचना
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११०१८

सदरची जाहीर नोटीस पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आ/ हि ३/न.र/का. १२५१